AC 28/5/2026/Arts/01 ITEM NO: 1.1.1

Deccan Education Society's

Kirti M. Doongursee College of Arts, Science and Commerce

(AUTONOMOUS)

Dadar (W), Mumbai -28

Affiliated to

UNIVERSITY OF MUMBAI

**Title of the program**

**A-** U.G. Certificate in Marathi

**B-** U.G. Diploma in Marathi

**C-** **B.A** (Marathi)

**Syllabus for**

**Semester – Sem I & II**

**Ref: GR dated 20th April, 2023 for Credit Structure of UG**

**(With effect from the academic year 2026-27 Progressively)**

# PROGRAM OUTCOMES

| PO | Description |
|---|---|
| A student completing Bachelor’s Degree in **Arts** Program will be able to | |
| PO1 | **विषयाचे ज्ञान :** निवडलेल्या विषयातील पारंपारिक ज्ञान आणि त्याचा आधुनिक जगाशी असलेला संबंध यांचा मेळ घालणे. निवडलेल्या अभ्यासक्रमातून प्राप्त झालेली सैद्धांतिक आणि व्यावहारिक समज प्रभावीपणे मांडणे. |
| PO2 | **चिकित्सक विचार आणि समस्या निवारण :** चिकित्सक विचार कौशल्याचे प्रदर्शन करणे आणि सामाजिक वातावरणातील समस्या सोडवण्यासाठी उच्च श्रेणीतील बौद्धिक क्षमतेचा वापर करणे; तसेच त्यावर व्यवहार्य उपाय सुचवून त्यांच्या अंमलबजावणीत मदत करणे. |
| PO3 | **सामाजिक सक्षमता :** वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात उत्तम परस्पर संबंध निर्माण करण्यासाठी स्वतःचे विचार स्पष्टपणे आणि अचूकपणे मांडणे. प्रत्यक्ष किंवा आभासी माध्यमांत प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठी भाषिक कौशल्यांचा वापर करणे. समूह कार्यात बहुसांस्कृतिक संवेदनशीलता जपणे. |
| PO4 | **संशोधन विषयक कौशल्ये :** निवडलेल्या आणि संबंधित क्षेत्रांत संशोधन व उच्च शैक्षणिक यशासाठी संधी शोधणे; तसेच संशोधन नीतिमत्ता, बौद्धिक संपदा अधिकार आणि वाङ्मयचौर्य (Plagiarism) यांविषयी जागरूक असणे. चौकस वृत्ती आणि संबंधित प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित करणे; मार्गदर्शनाखाली एखाद्या संशोधन प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी आणि अहवाल सादरीकरण करण्याचे कौशल्य आत्मसात करणे. |
| PO5 | **वैयक्तिक आणि व्यावसायिक सक्षमता :**भक्कम कार्यसंस्कृती आणि व्यावसायिक कौशल्यांनी स्वतःला सज्ज करणे, जेणेकरून स्वतंत्रपणे तसेच सांघिक वातावरणात काम करणे शक्य होईल. |
| PO6 | **प्रभावी नागरिकत्व आणि नीतिमत्ता:** सहानुभूतीपूर्वक सामाजिक बांधिलकी आणि समतेवर आधारित राष्ट्रविकास दर्शवणे. नैतिक मुद्द्यांच्या जाणीवेतून कृती करणे आणि व्यावसायिक नीतिमत्ता व जबाबदारीशी बांधील राहणे. |
| PO7 | **पर्यावरण आणि शाश्वतता** : वैज्ञानिक उपायांचा समाज आणि पर्यावरणावर होणारा परिणाम समजून घेणे आणि शाश्वत विकासाचे ज्ञान व गरज स्पष्ट करणे. |
| PO8 | **स्वयं-निर्देशित आणि आजीवन अध्ययन:** बदलत्या जागतिक संदर्भात स्वतंत्रपणे आणि आयुष्यभर शिकत राहण्याची (अध्ययनाची) क्षमता प्राप्त करणे. |

# PROGRAM SPECIFIC OUTCOMES

| PSO | Description |
|---|---|
| PSO1 | **मराठी साहित्य आणि भाषिक समज:-** मराठी साहित्यातील विविध कालखंड, वाङ्मयप्रकार (उदा. नाटक, लोकसाहित्य, आत्मचरित्र) आणि साहित्य प्रवाहांचा सखोल अभ्यास करून त्यातील सांस्कृतिक व सामाजिक संदर्भांचे विश्लेषण करणे. तसेच मराठी भाषेची संरचना आणि व्याकरणिक अंगांची सैद्धांतिक व व्यावहारिक समज आत्मसात करणे. |
| PSO 2 | **व्यावसायिक भाषिक कौशल्ये आणि डिजिटल साक्षरता:-** संभाषण, लेखन आणि वाचन या कौशल्यांचा व्यावसायिक स्तरावर विकास करणे. मराठी भाषेचा वापर करून विविध प्रसारमाध्यमे, जाहिरात क्षेत्र आणि प्रशासकीय कामकाजात प्रभावीपणे व्यक्त होणे. तसेच युनिकोड टायपिंग, डेस्कटॉप पब्लिशिंग (DTP) आणि गुगल फॉर्म्स यांसारख्या आधुनिक डिजिटल साधनांचा मराठी अभ्यासात वापर करण्यास सक्षम होणे. |
| PSO 3 | **संशोधन वृत्ती आणि चिकित्सक विश्लेषण:-** मराठी साहित्य आणि भाषेच्या क्षेत्रात संशोधनाची आवड निर्माण करणे. साहित्यकृतींचे मूल्यमापन करताना चिकित्सक विचार पद्धतीचा अवलंब करणे आणि नैतिक मूल्ये जपून एखादा लघुशोधप्रबंध किंवा प्रकल्प अहवाल तयार करण्याची क्षमता विकसित करणे. |
| PSO 4 | **सामाजिक संवेदनशीलता आणि उपयोजित मराठी:-** मराठी साहित्यातून मिळणाऱ्या मानवी मूल्यांची जोपासना करून एक जबाबदार आणि प्रगल्भ नागरिक म्हणून समाजात वावरणे. अनुवाद कौशल्ये, पटकथा लेखन आणि संपादन यांसारख्या कौशल्य-आधारित अभ्यासक्रमातून रोजगाराच्या संधी शोधणे आणि भाषेचा उपयोग आधुनिक जगाच्या गरजांनुसार करणे. |

Deccan Education Society's

Kirti M. Doongursee College of Arts, Science and Commerce

(AUTONOMOUS)

| Sr. No. | Heading | Particulars | |
|---|---|---|---|
| 1 | **Title of program**<br>**O: ________________A** | **A** | **U.G. Certificate in Marathi** |
| | **O: ________________B** | **B** | **U.G. Diploma in Marathi** |
| | **O: ________________C** | **C** | **B.A. (Marathi)** |
| 2 | **Eligibility**<br><br>**O: ________________A** | **A** | HSC(**Arts / Commerce / Science**)<br>**OR**<br>Passed Equivalent Academic Level 4.0 |
| | **O: ________________B** | **B** | Under Graduate Certificate in _________<br>**OR**<br>Passed Equivalent Academic Level 4.5 |
| | **O: ________________C** | **C** | Under Graduate Diploma in _________<br>**OR**<br>Passed Equivalent Academic Level 5.0 |
| 3 | **Duration of program R: _________** | **A** | One Year |
| | | **B** | Two Years |
| | | **C** | Three Years |
| 4 | **Intake Capacity**<br>**R: __________________** | **120** | |

**Sign of the HOD & Coordinator**
**BOS in _______**

**Sign of the NEP Coordinator, DES's Kirti M. Doongursee College**

**Sign of Principal**
**DES's Kirti M. Doongursee College, Mumbai 28.**

# Preamble

## 1) Introduction

सुमारे दोन हजार वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेली मराठी भाषा, आपल्या अभिजात वैशिष्ट्यांमुळे जागतिक भाषांच्या प्रवाहात आजही आपले महत्त्वपूर्ण स्थान टिकवून आहे. महानुभाव संप्रदायातील प्रारंभीच्या साहित्यापासून ते आजच्या आधुनिक कालखंडापर्यंत मराठी भाषा आणि साहित्याने नवनवीन रूपे धारण करत आपला विकास साधला आहे.

प्रस्तुत अभ्यासक्रमाचे मुख्य ध्येय विद्यार्थ्यांमध्ये साहित्यविषयक अभिरुची आणि संवेदनक्षमता विकसित करणे हे आहे. साहित्याच्या मुळाशी असलेल्या विविध प्रेरणा व प्रवृत्तींचा परिचय करून देण्यासोबतच, आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासाचे आणि भाषेच्या शास्त्रीय स्वरूपाचे आकलन विद्यार्थ्यांना करून देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. साहित्याच्या माध्यमातून समाज, संस्कृती आणि त्यातील सांस्कृतिक संदर्भांची जाण निर्माण करून, विद्यार्थ्यांमध्ये साहित्यकलेचा आस्वाद घेण्याची व समीक्षा करण्याची क्षमता विकसित करण्यावर यात भर देण्यात आला आहे. साहित्याच्या अभ्यासाबरोबरच विविध भाषिक कौशल्यांचा परिचय करून देऊन त्यांच्या प्रत्यक्ष उपयोजनाची क्षमता वाढवणे, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या चतुर्विध कौशल्यांवर समयोचित प्रभुत्व मिळवून देणे, हे या अभ्यासक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## 2) Aims and Objectives

१. मराठी साहित्यातील विविध कालखंडांतील प्रेरणा आणि प्रवृत्तींचा सखोल अभ्यास करणे.

२. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासाचे स्वरूप आणि त्यातील स्थित्यंतरांचे आकलन करून घेणे.

३. भाषेच्या शास्त्रीय आणि तांत्रिक स्वरूपाचा परिचय करून देऊन भाषिक जाण विकसित करणे.

४. साहित्याच्या माध्यमातून समाज व संस्कृतीचा परिचय करून देणे आणि साहित्यातील सांस्कृतिक संदर्भांची प्रगल्भ जाण निर्माण करणे.

५. विविध साहित्यप्रकारांतील महत्त्वाच्या कलाकृतींच्या आधारे विद्यार्थ्यांमध्ये साहित्यविषयक अभिरुची आणि संवेदनक्षमता वृद्धिंगत करणे.

६. साहित्यकलेचा आस्वाद घेण्याची आणि साहित्याची वस्तुनिष्ठ समीक्षा करण्याची क्षमता निर्माण करणे.

७. विविध भाषिक कौशल्यांचा परिचय करून देऊन त्यांच्या प्रत्यक्ष उपयोजनाची क्षमता वाढवणे.

८. मराठी भाषा, तिचा व्यावहारिक वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यात प्रभावी समन्वय साधणे.

९. भाषेच्या श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या चतुर्विध कौशल्यांवर प्रभुत्व मिळवून देणे.

## 3) Learning Outcomes

- **साहित्यिक समज विकसित करतील:** मराठी साहित्याच्या विविध प्रेरणा आणि प्रवृत्तींचा अभ्यास करून, विद्यार्थ्यांना मराठी वाङ्मयीन परंपरेचे आणि आधुनिक प्रवाहांचे सखोल आकलन होईल.

- **सांस्कृतिक जाणीव प्रगल्भ करतील:** साहित्याच्या माध्यमातून समाज आणि संस्कृतीचा अनुबंध समजून. घेऊन, विद्यार्थ्यांमध्ये साहित्याच्या सांस्कृतिक संदर्भांची प्रगल्भ जाणीव निर्माण होईल.

- **रसास्वाद आणि समीक्षा कौशल्य आत्मसात करतील:** नाटक आणि कविता यांसारख्या महत्त्वाच्या साहित्यकृतींच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन अभिरुची वाढेल आणि साहित्यकलेचा आस्वाद घेण्याची व तिचे चिकित्सक विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होईल.

- **व्यावसायिक भाषिक कौशल्यात पारंगत होतील:** मुद्रित माध्यमांसाठी लेखन आणि सूत्रसंचालन यांसारख्या उपयोजित विषयांद्वारे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती कौशल्यात वाढ होईल, ज्यामुळे त्यांना व्यावसायिक क्षेत्रासाठी आवश्यक ती सक्षमता प्राप्त होईल.

- **तंत्रस्नेही भाषिक वापर करतील:** मराठी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञान (युनिकोड, पीपीटी इ.) यांचा प्रभावी समन्वय साधून, विद्यार्थी डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा सुरक्षित आणि कायदेशीर वापर करण्यास सक्षम बनतील.

- **भाषिक चतु:सूत्रीवर प्रभुत्व मिळवतील:** श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या चारही मूलभूत भाषिक कौशल्यांवर प्रभुत्व मिळवून, विद्यार्थी विविध सामाजिक आणि व्यावसायिक स्तरांवर प्रभावी संवाद साधू शकतील.

4) **Any other point (if any) - NA**

| Semester | Course Code | Course Title | Vertical | Credit |
|---|---|---|---|---|
| I | 26 MAR MJ 111 | नाटक या साहित्य प्रकाराचा अभ्यास | Major | 4 |
| | 26 MAR VSC 141 | व्यावसायिक मराठी आणि सूत्रसंचालन कौशल्य | VSC | 2 |
| | 26 MAR AEC 161 | मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य- भाग १ | Ability Enhancement Courses | 2 |
| II | 26 MAR MJ 211 | कविता या साहित्य प्रकाराचा अभ्यास | Major | 4 |
| | 26 MAR VSC 241 | मराठी भाषा आणि संगणक | VSC | 2 |
| | 26 MAR AEC 261 | मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य- भाग २ | Ability Enhancement Course | 2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|

<table>
<tr><td>Course Code</td><td>MAJOR SEM – I</td><td>Credits</td><td>Lectures/Week</td></tr>
<tr><td>26MARMJ111</td><td>नाटक या साहित्य प्रकाराचा अभ्यास Paper I</td><td>4</td><td>4</td></tr>
<tr><td colspan="4">Course Objectives(CO): (List the course objectives)<br>CO1. नाटक या साहित्यप्रकाराची तात्विक संकल्पना स्पष्ट करणे.<br>CO2. नाट्य साहित्याचे स्वरूप आणि त्यातील विविध वैशिष्ट्यांचा सखोल परिचय करून देणे.<br>CO3. नाटक या वाङ्मयप्रकाराचा 'संहिता' आणि 'प्रयोग' अशा दोन्ही अंगांनी अभ्यास करणे.<br>CO4. नाटकाच्या आशयाचे चिकित्सक आकलन, रसग्रहण आणि विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे.</td></tr>
<tr><td colspan="4">Course Outcomes (OC): ( List the course outcomes)<br>OC1. विद्यार्थी नाटक या साहित्य प्रकाराची व्याख्या घटक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी यातील महत्त्वाच्या संज्ञांचे अचूक स्मरण व ओळख करतील.<br>OC2. नाटकाचे दृकश्राव्य स्वरूप आणि इतर साहित्य प्रकारांपेक्षा असणारे त्याचे वेगळेपण याचे आकलन करून घेतील.<br>OC3. नाटकाची संवादशैली आणि रचनावैशिष्ट्ये यांचा नाट्यवाचन किंवा संहितेत उपयोजन करण्यास विद्यार्थी सक्षम होतील.<br>OC4. नाटकातील पात्रांचे स्वभाववैशिष्ट्य आणि त्यातील सामाजिक- राजकीय संदर्भांचे विद्यार्थी विश्लेषण करतील.</td></tr>
<tr><td>Unit</td><td colspan="2">Topics</td><td>No of Lectures</td></tr>
<tr><td>I</td><td colspan="2">घटक १ - नाटक या साहित्य प्रकाराचे तात्विक विवेचन<br>अ) नाटक या साहित्य प्रकाराचे स्वरूप<br>(१) नाटकाची संकल्पना नाटकाची दोन रुपे- संहिता व प्रयोग<br>(२) नाट्यसंहितेतील घटक- विषयसूत्र,कथानक ,पात्र,संवाद,भाषा, काल -अवकाश, रंगसूचना<br>आ)नाटकाचे प्रकार-शोकात्मिका,सुखात्मिका,प्रहसन अतिरंजित नाट्य, वगनाट्य,चर्चा नाट्य ,दीर्घांक ,एकांकिका</td><td>15</td></tr>
<tr><td>II</td><td colspan="2">घटक २- नाटकाच्या संहितेचा अभ्यास- १</td><td>15</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | ती फुलराणी - पु. ल. देशपांडे<br>नाटकाची पार्श्वभूमी आणि रूपांतराचे स्वरूप<br>कथानक आणि प्रसंगनिष्ठ मांडणी<br>व्यक्तिरेखांचे चिकित्सक विश्लेषण<br>भाषिक वैशिष्ट्ये आणि संवादशैली | |
| **III** | **घटक ३- एकांकिका या साहित्य प्रकाराचे तात्विक विवेचन**<br>१. एकांकिकेची संकल्पना, व्याख्या आणि स्वरूप:<br>२. एकांकिकेचे प्रमुख घटक<br>३. एकांकिकेची संवादशैली आणि तंत्र:<br>४. एकांकिका आणि पूर्ण लांबीचे नाटक - तुलनात्मक अभ्यास: | **15** |
| **IV** | **घटक ४ - एकांकिकांचा अभ्यास**<br>एकांकिका - कालच्या आजच्या<br>लावलेल्या पुस्तकातील निवडक एकांकिकांचा अभ्यास<br>पुस्तकातील प्रतिनिधीक एकांकिकांचे कथानक आणि विषयसूत्र.<br>एकांकिकेचे नाट्यतंत्र आणि सादरीकरण<br>एकांकिकेच्या माध्यमातून होणारा भाषिक विकास. | **15** |

**References:**


1. ती फुलराणी - पु. ल.देशपांडे
2. एकांकिका कालच्या आजच्या- डॉ.धनाजी गुरव, डॉ.राजेंद्र डोंगरदिवे, प्रा. जगदीश राणे.
3. मराठी नाटक आणि रंगभूमी चा इतिहास (आरंभापासून १९९०) पर्यंत प्रा. दत्ता भगत,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळ मुंबई २०१९
4. नाटक एक वाङ्मय प्रकार, दत्ता भगत, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ,नाशिक २००२
5. मराठी एकांकिका: तंत्र आणि विकास – प्रा. वसंत वऱ्हाडपांडे


Additional References:


1. मराठी नाट्यलेखन तंत्राची वाटचाल – अरविंद वामन कुळकर्णी (व्हिनस प्रकाशन).
2. मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय – श्री. ना. बनहट्टी (पुणे विद्यापीठ प्रकाशन).
3. नाटक: एक साहित्यप्रकार – सुधीर रसाळ (मौज प्रकाशन).
4. साहित्य: अध्यापन आणि प्रकार – संपा. श्री. पु. भागवत (पॉप्युलर - मौज).
5. ती फुलराणी' (मूळ संहिता) – पु. ल. देशपांडे (मौज प्रकाशन)

| Course Code | VOCATIONAL SKILL COURSE SEM – I | Credits | Lectures/ Week |
|---|---|---|---|
| **26MARVSC141** | **व्यावसायिक मराठी व सूत्रसंचालन कौशल्य Paper I** | **2** | **2** |

**Course Objectives(CO):** (List the course objectives)

CO1. सूत्रसंचालन क्षेत्रातील तांत्रिक संज्ञा आणि सूत्रसंचालकाची जबाबदारी व भूमिका यांची ओळख करून देणे.

CO2. विद्यार्थ्यांच्या संवादशैलीत स्पष्टता, प्रभावी शब्दफेक आणि आत्मविश्वास निर्माण करून त्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे.

CO3. विविध स्तरावरील कार्यक्रमांच्या स्वरूपानुसार दर्जेदार आणि प्रभावी संहिता लेखनाचे कौशल्य विकसित करणे.

CO4. कार्यक्रमाचे नियोजन, पाहुण्यांचा परिचय आणि प्रत्यक्ष सादरीकरणाचे व्यावसायिक तंत्र अवगत करणे.

**Course Outcomes (OC):** ( List the course outcomes)

OC1. विद्यार्थी सूत्रसंचालनाचे प्रकार आणि तांत्रिक संज्ञांचे स्मरण करतील.

OC2. कार्यक्रमाचे स्वरूप ओळखून योग्य शब्द फेक आणि संवादाचे महत्व विद्यार्थी समजून घेतील

OC3. विविध प्रसंगांसाठी प्रभावी सूत्रसंचालन संहिता तयार करण्याचे विद्यार्थी उपयोजन करतील.

OC4. निवेदकांच्या सादरीकरण शैलीचे आणि प्रेक्षकांच्या प्रतिसादाचे विद्यार्थी चिकित्सक विश्लेषण करतील

| Unit | Topics | No of Lectures |
|---|---|---|
| **I** | घटक १- सूत्रसंचालन संकल्पना आणि पूर्वतयारी<br>१) सूत्रसंचालकाची भूमिका,जबाबदारी आणि आवश्यक गुण- आत्मविश्वास ,समय सुचकता.<br>२)वाचक अभिनय- स्पष्ट उच्चार ,आवाजातील चढ-उतार आणि शब्द फेक.<br>३) कार्यक्रमाची रूपरेषा समजून घेणे आणि पाहुण्यांचा परिचय करून देण्याचे तंत्र. | **15** |
| **II** | घटक २- प्रत्यक्ष संहिता लेखन आणि सादरीकरण<br>१) औपचारिक कार्यक्रम- उद्घाटन ,व्याख्यान ,निरोप समारंभ यांची संहिता<br>२) अनौपचारिक कार्यक्रम -स्नेहसंमेलन, वाढदिवस यांची संहिता | **15** |

| | | |
|---|---|---|
| | ३) निम औपचारिक कार्यक्रम - माजी विद्यार्थी मेळावा ,कर्मचारी सत्कार समारंभ, कार्यशाळा | |

**References:**


1. सूत्रसंचालन- एक कला. डॉ. सुधीर देवरे, अक्षरबंध प्रकाशन नाशिक
2. सूत्रसंचालन आणि निवेदन, पद्माकर पाठकजी, ज्ञानगंगा प्रकाशन
3. उत्कृष्ट कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन, आचार्य जयप्रकाश बागडे, संकेत प्रकाशन
4. सूत्रसंचालन - एक कला, सुनीता तारापूरे, सुविद्य प्रकाशन


**Additional References:**


1. व्यावहारिक मराठी – डॉ. कल्याण काळे आणि डॉ. दत्तप्रसाद पुंडे (पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन)
2. उपयोजित मराठी – संपा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि डॉ. दत्तप्रसाद पुंडे.
3. सूत्रसंचालन : स्वरूप आणि कौशल्ये – डॉ. प्रकाश खांडगे

| Course Code | ABILITY ENHANCEMENT COURSE<br>(LANGUAGE 2)<br>SEM – I | Credits | Lectures/<br>Week |
|---|---|---|---|
| | **मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य- भाग १ Paper I** | **2** | **2** |

**Course Objectives(CO):** (List the course objectives)

CO1. मुद्रित माध्यमांचे स्वरूप आणि त्यातील विविध लेखनप्रकारांच्या तांत्रिक अंगांचा परिचय करून देणे.

CO2. मुद्रित माध्यमांसाठी प्रभावी लेखन करण्यास आवश्यक असणारी कौशल्ये आणि प्रगत तंत्रे विकसित करणे.

CO3. लेखनप्रकारांच्या गरजेनुसार भाषेचे स्वरूप, शैली आणि त्यातील बदलांचे चिकित्सक आकलन करून देणे.

CO4. विद्यार्थ्यांना विविध मुद्रित माध्यमांतील लेखनाचा प्रत्यक्ष सराव आणि उपयोजनाची संधी उपलब्ध करून देणे.

**Course Outcomes (OC):** ( List the course outcomes)

OC1. विद्यार्थी मुद्रित माध्यमांचे स्वरूप आणि विविध लेखन प्रकारांच्या मूलभूत संज्ञांचे स्मरण करतील.

OC2. बातमी वृत्तलेख यांमधील तात्विक व व्यावहारिक फरक विद्यार्थी समजून घेतील.

OC3. दिलेल्या विषयावर बातमी व वृत्तलेख करण्यासाठी भाषिक कौशल्यांचे उपयोजन करतील.

OC4. विद्यार्थी विविध संस्थांच्या प्रसिद्धी पत्रकाचे चिकित्सक विश्लेषण करून त्यातील त्रुटी शोधतील.

| Unit | Topics | No of Lectures |
|---|---|---|
| I | १) मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य -संकल्पना व स्वरूप<br>मुद्रित माध्यमांची संकल्पना, व्याख्या आणि स्वरूप.<br>मुद्रित माध्यमांचा इतिहास (थोडक्यात आढावा).<br>लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून मुद्रित माध्यमांची भूमिका.<br>मुद्रित माध्यमांचे विविध प्रकार (वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक).<br><br>२) बातमी लेखन<br>बातमीची व्याख्या आणि बातम्यांचे स्रोत.<br>बातमीचे स्वरूप: शीर्षक , मथळा आणि बातमीचा तपशील.<br>बातमी लेखनाचे निकष: सत्यता, वस्तुनिष्ठता आणि निपक्षपातीपणा.<br>विविध क्षेत्रांतील बातम्यांचे प्रकार (राजकीय, क्रीडा, गुन्हेगारी, शैक्षणिक, सांस्कृतिक). | 15 |

| | | |
|---|---|---|
| II | १) वृत्तलेख<br>वृत्तलेखाची संकल्पना व व्याख्या<br>वृत्तलेखाचे प्रकार<br>वृत्तलेखाची संरचना<br>वृत्तलेखनासाठी आवश्यक कौशल्ये<br><br>२)प्रसिद्धी पत्रक<br>प्रसिद्धी पत्रकाची संकल्पना व आवश्यकता<br>प्रसिद्धी पत्रकाचे प्रकार<br>प्रसिद्धी पत्रकाचा आराखडा आणि लेखन तंत्र<br>प्रसिद्धी पत्रकाची प्रसिद्धी आणि संपर्क | 15 |

**References:**

1. व्यवहारिक मराठी,ल. रा. नसिराबादकर.भाषा विकास संशोधन संस्था कोल्हापूर, २०२३
2. मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये, अरुण खोरे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००२
3. मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य, अंजली मास्करहन्स, विपुल प्रकाशन

**Additional References:**

1. लेखनकौशल्य : मुद्रितशोधन व सर्जनशील लेखन - डॉ. संदीप कडू माळी, प्रा. समाधान पाटील (Prashant Publications)
2. प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये आणि कार्यालयीन मराठी भाषा - देविदास खोडेवाड (Vidya Books)

| Course Code | MAJOR SEM – II | Credits | Lectures/ Week |
|---|---|---|---|
| 26MAR MJ211 | कविता या साहित्यप्रकाराचा अभ्यास | 4 | 4 |
| | | | |

**Course Objectives(CO):** (List the course objectives)

CO1. कविता या साहित्यप्रकाराची तात्त्विक संकल्पना आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

| |
|---|
| CO2. काव्य साहित्याचे स्वरूप आणि त्यातील विविध प्रवाहांचा सखोल परिचय करून देणे.<br>CO3. कवितेची रचना, घाट आणि त्यातील अभिव्यक्तीच्या विविध अंगांचा अभ्यास करणे.<br>CO4. विद्यार्थ्यांमध्ये काव्यकृतीचे आकलन, रसास्वाद आणि चिकित्सक विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे. |
| **Course Outcomes (OC):** ( List the course outcomes)<br>OC1. विद्यार्थी 'कविता' या साहित्यप्रकाराची संकल्पना आणि त्याचे अन्य साहित्यप्रकारांपेक्षा असलेले वेगळेपण सांगू  शकतील.<br>OC2. कवितेची लय, शब्दकळा आणि प्रतिमा यांसारख्या रचनावैशिष्ट्यांचे आकलन विद्यार्थ्यांना होईल.<br>OC3. कवितेतून व्यक्त होणाऱ्या मानवी संवेदना, भावना आणि सांस्कृतिक संदर्भांचे  भान विद्यार्थ्यांना येईल.<br>OC4. कवितेतील समाज,राजकारण आणि विविध विचारसरणीचे चिकित्सक विश्लेषण करण्याची क्षमता  विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल. |

| **Unit** | **Topics** | **No of Lectures** |
|---|---|---|
| I | **घटक १- कविता या साहित्य प्रकाराचे तात्विक विवेचन**<br>१) कविता या साहित्य प्रकाराची संकल्पना<br>२) कविता या साहित्य प्रकाराची रचना वैशिष्ट्ये<br>३) कवितेच्या संहितेतील घटक<br>४) कवितेचे प्रकार व उपप्रकार | 15 |
| II | **घटक २-  तीन कवी -कवित्रीच्या प्रत्येकी दोन कविता**<br>अ) केशवसुत-<br>१. नवा शिपाई<br>२ .झपूर्झा<br><br>आ)  बहिणाबाई चौधरी -<br>१.अरे खोप्यामधी खोपा<br>२. धरत्रीले दंडवत<br><br>ई)  बालकवी-<br>१.श्रावणमासी हर्ष मानसी<br>२..फुलराणी | 15 |
| III | **घटक ३- तीन  कवी- कवयित्रीच्या प्रत्येकी दोन कविता**<br>**अ) कुसुमाग्रज-**<br>१.मराठी माती<br>२.सर्वात्मका शिवसुंदरा | 15 |

<table>
<tr><td></td><td>आ) विंदा करंदीकर-<br>१. माझ्या मना बन दगड<br>२.देणाऱ्याने देत जावे<br><br>इ) नारायण सुर्वे -<br>१.दोन दिवस<br>२.सूर्यकुलातील लोक</td><td></td></tr>
<tr><td>IV</td><td>घटक ४-तीन  कवी-कवित्रीच्या प्रत्येकी दोन कविता<br>अ) विठ्ठल वाघ -<br>१.तिफन<br>२. मेंढरं<br><br>आ) नामदेव ढसाळ-<br>१.रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो<br>२. डॉ. आंबेडकर १९९५<br><br>इ) अनुराधा पाटील-<br>१. माझ्या डोळ्यांसमोरून सरकत जातात<br>२. पोरी</td><td>15</td></tr>
</table>

**References:**


1.महात्मा फुले समग्र वाङ्मय' (संपादक: धनंजय कीर आणि स. ग. माळशे

2.साहित्य : स्वरूप आणि समीक्षा – वा. ल. कुळकर्णी

3. बहिणाबाईंची गाणी' (संपादक: सोपानदेव चौधरी / प्रस्तावना: प्र. के. अत्रे)

4.मराठी कविता : परंपरा आणि प्रगती – डॉ. गं. बा. सरदार

5.डॉ. भालचंद्र फडके (नामदेव ढसाळ यांच्या कवितेसाठी)


**Additional References :**


1. मराठी कवितेची दर्शनं – डॉ. अक्षयकुमार काळे
2. कविता आणि प्रतिमा – डॉ. सुधीर रसाळ
3. साहित्य आणि समीक्षा – डॉ. वा. ल. कुळकर्णी
4. महात्मा फुले समग्र वाङ्मय – संपादक: य. दि. फडके
5. कृषी संस्कृतीची कविता – डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

<table>
<tr><td>Course Code</td><td>VOCATIONAL SKILL COURSE<br>SEM – II -</td><td>Credits</td><td>Lectures/ Week</td></tr>
<tr><td>26MARVSC241</td><td>मराठी भाषा आणि संगणक</td><td>2</td><td>2</td></tr>
<tr><td colspan="4">Course Objectives(CO): (List the course objectives)<br>CO1. मराठी भाषा आणि संगणकीय तंत्रज्ञान यांच्यातील परस्पर संबंध प्रस्थापित करून भाषिक उपयोजनाची व्याप्ती वाढवणे.<br>CO2. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्राचा वापर करून प्रभावी 'पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन' (PPT) तयार करण्यास तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे.<br>CO3. व्यावसायिक संधींच्या उद्देशाने सोशल मीडिया आणि 'मराठी युनिकोड' वापरण्याचे कौशल्य विकसित करणे.<br>CO4. सोशल मीडिया आणि युनिकोड वापराचे फायदे, मर्यादा तसेच सायबर सुरक्षिततेच्या (जोखीम) संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जाणीव-जागृती निर्माण करणे.</td></tr>
<tr><td colspan="4">Course Outcomes (OC): ( List the course outcomes)<br>OC1. युनिकोड टंकलेखन आणि संगणकीय प्रणालीच्या मूलभूत संज्ञांची ओळख करून घेतील.<br>OC2. सोशल मीडिया आणि ब्लॉग या माध्यमांचे स्वरूप, कार्यपद्धती आणि त्यांच्या प्रभावी संचालनाची संकल्पना स्पष्ट करतील.<br>OC3. वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासासाठी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन (PPT) आणि डिजिटल माध्यमांचा प्रत्यक्ष वापर होईल.<br>OC4. युनिकोड आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करताना कायदेशीर बाबी, सायबर सुरक्षा आणि सुरक्षितता यांचे चिकित्सक विश्लेषण करतील.</td></tr>
<tr><td>Unit</td><td colspan="2">Topics</td><td>No of Lectures</td></tr>
<tr><td>I</td><td colspan="2">युनिकोड टंकलेखन आणि पावर पॉइंट सादरीकरण परिचय<br>१. युनिकोड प्रणाली आणि मराठी भाषा: युनिकोड म्हणजे काय? जागतिक स्तरावर युनिकोडचे महत्त्व.<br>२. मराठी कीबोर्ड लेआउट्सचा परिचय: कीबोर्ड लेआउट्सची ओळख आणि त्यांची कार्यपद्धती.<br>३.सादरीकरण संकल्पना: प्रभावी पॉवरपॉइंट सादरीकरणाचे घटक, स्लाईडची रचना, मजकूर आणि चित्रांचे संतुलन राखण्याचे प्राथमिक नियम.</td><td>15</td></tr>
<tr><td>II</td><td colspan="2">युनिकोड टंकलेखन आणि पावर पॉइंट सादरीकरण प्रात्यक्षिक</td><td>15</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | १. मराठी युनिकोड टंकलेखन सराव: संगणकाच्या साहाय्याने प्रत्यक्ष मराठी टायपिंगचा सराव करणे.<br>२. पॉवरपॉइंट स्लाईड निर्मिती आणि मांडणी: नवीन स्लाईड तयार करणे, योग्य लेआउट निवडणे, मराठी फॉन्टची निवड करणे आणि मजकुराचे सुबक आयोजन करणे.<br><br>३.प्रत्यक्ष सादरीकरण आणि फाईल व्यवस्थापन: तयार केलेले सादरीकरण (PPT) प्रभावीपणे सादर करणे, फाईल सुरक्षितपणे सेव करणे. | |

**References:**


1. संगणकावरील मराठी आणि युनिकोड (तंत्र आणि मंत्र ) लेखक- माधव शिरवळकर. प्रकाशक- संगणक प्रकाशन, कला विभाग
2. व्यावहारिक मराठीलेखक: डॉ. ल. रा. नसिराबादकर. प्रकाशक: फडके प्रकाशन, कोल्हापूर.
3. संगणक परिचय आणि मराठी टंकलेखन – डॉ. विनायक पाटील.
4. मराठी भाषेचे तंत्रज्ञान आणि युनिकोड – डॉ. सुधीर देवरे.


**Additional References:**


1.संगणक आणि मराठी भाषा - डॉ. दीपक टिळक (मराठी मुद्रण परिषद):

2.माहिती तंत्रज्ञान आणि मराठी भाषा - संपा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (दिलीपराज प्रकाशन)

| Course Code | ABILITY ENHANCEMENT COURSE<br>SEM – II - | Credits | Lectures/ Week |
|---|---|---|---|
| | **मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये** | **2** | **2** |

**Course Objectives(CO):** (List the course objectives)

CO1. स्तंभलेखन, जाहिरात, पत्रव्यवहार आणि मुद्रितशोधन यांसारख्या व्यावहारिक मराठीच्या विविध क्षेत्रांतील आधारभूत संकल्पनांचे ज्ञान प्रदान करणे.

CO2. वाचकांचा पत्रव्यवहार आणि व्यावसायिक जाहिरात यांमधील रचनात्मक वैशिष्ट्ये आणि त्यातील तांत्रिक भिन्नता विषद करणे.

CO3. विविध विषयांच्या संदर्भात तर्कसंगत स्तंभलेखन, प्रभावी जाहिरात निर्मिती आणि औपचारिक पत्रलेखन करण्याची प्रगत लेखनशैली विकसित करणे

CO4. मुद्रित साहित्यातील भाषिक दोषांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची दृष्टी देऊन, विद्यार्थ्यांना व्यावसायिक स्तरावरील मुद्रितशोधनासाठी सक्षम करणे.

**Course Outcomes (OC):** ( List the course outcomes)

OC1. विद्यार्थी स्तंभलेखन, जाहिरात, पत्रव्यवहार आणि मुद्रितशोधन यामध्ये मूलभूत संज्ञांचे स्मरण करतील.

OC2. वाचकांचा पत्रव्यवहार आणि व्यावसायिक जाहिरात यांमधील रचनात्मक फरक समजून घेतील.

OC3. दिलेल्या विषयावर प्रभावी स्तंभलेखन, जाहिरात आणि पत्रलेखन करण्याचे उपाययोजन करतील.

OC4. मुद्रित मजकुरातील भाषिक त्रुटींचे विश्लेषण करून निर्दोष मुद्रित शोधन करतील.

| Unit | Topics | No of Lectures |
|---|---|---|
| **I** | १) स्तंभलेखन<br>स्तंभलेखनाची संकल्पना व व्याख्या<br>स्तंभलेखाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये<br>स्तंभलेखनाचे विविध प्रकार<br>स्तंभलेखनाची प्रक्रिया आणि तंत्र<br><br>२) वृत्तपत्रासाठी पत्रलेखन (वाचकांचा पत्रव्यवहार)<br>वाचकांच्या पत्रव्यवहाराची संकल्पना व उद्दिष्टे<br>पत्रांचे विविध प्रकार आणि वर्गीकरण<br>पत्राची संरचना आणि लेखन तंत्र<br>संपादकीय निकष आणि संपादन प्रक्रिया | **15** |
| **II** | १) जाहिरात लेखन<br>जाहिरात लेखनाची संकल्पना व उद्दिष्टे<br>जाहिरातींचे विविध प्रकार | **15** |

| | | | |
|---|---|---|---|
| | जाहिरात लेखनाची अंगभूत कौशल्ये<br>जाहिरातीची भाषा आणि मांडणी<br>जाहिरातींचे बदलते स्वरूप<br><br>२) मुद्रित शोधन<br>मुद्रित शोधनाची संकल्पना व उद्दिष्टे<br>मुद्रित शोधकाची पात्रता आणि गुण<br>मुद्रित शोधनाची प्रक्रिया आणि टप्पे<br>शुद्धलेखनाचे नियम आणि मुद्रित शोधन | |

**References**


1. व्यवहारिक मराठी,ल. रा. नसिराबादकर.भाषा विकास संशोधन संस्था कोल्हापूर, २०२३
2. मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये, अरुण खोरे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००२
3. व्यावहारिक मराठी – डॉ. कल्याण काळे आणि डॉ. अंजली सोमण
4. उपयोजित मराठी – डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि डॉ. द. दि. पुंडे.


**Additional References :**


1. सुगम मराठी व्याकरण आणि लेखन – मो. रा. वाळंबे, नितीन प्रकाशन
2. मराठी भाषेचे वळण – द. न. गोखले
3. वृत्तपत्रीय स्तंभलेखन : एक अभ्यास,. विनया खडके, प्रतिमा प्रकाशन, पुणे

**Evaluation Scheme for First Year Bachelor of Arts (UG)**

**under NEP 2020 (4 credits)**

**I. Internal Evaluation for Theory Courses – 40 Marks**

**1) Continuous Internal Assessment (CIA) Assignment** - Tutorial/ Case Study/ Project / Presentations/ Group Discussion / Ind. Visit. – 20 marks

**2) Continuous Internal Assessment (CIA)** ONLINE / OFFLINE Unit Test – 20 marks - 30 Minutes

**II. External Examination for Theory Courses – 60 Marks**

Duration: 2 Hours

Theory question paper pattern:

| **Question** | **Based on** | **Marks** |
|---|---|---|
| Q.1 | Unit I | 15 |
| Q.2 | Unit II | 15 |
| Q.3 | Unit III | 15 |
| Q.4 | Unit IV | 15 |

- All questions shall be compulsory with internal choice within the questions.
- Each Question may be sub-divided into sub questions as a, b, c, d, etc. & the allocation of Marks depends on the weightage of the topic.

**NOTE: To pass the examination, attendance is compulsory in both Internal & External Theory Examinations.**

**Evaluation Scheme for First Year Bachelor of Arts (UG)**

**under NEP 2020 (2 credits)**

**I. Internal Evaluation for Theory Courses – 20 Marks**

**1) Continuous Internal Assessment (CIA) Assignment** - Tutorial/ Case Study/ Project / Presentations/ Group Discussion / Ind. Visit. – 10 marks

**2) Continuous Internal Assessment (CIA)** ONLINE / OFFLINE Unit Test – 10 marks - 15 Minutes

**II. External Examination for Theory Courses – 30 Marks**

Duration: 1 Hour

Theory question paper pattern:

| Question | Based on | Marks |
|---|---|---|
| Q.1 | Unit I | 15 |
| Q.2 | Unit II | 15 |

- All questions shall be compulsory with internal choice within the questions.
- Each Question may be sub-divided into sub questions as a, b, c, d, etc. & the allocation of Marks depends on the weightage of the topic.

- **NOTE: To pass the examination, attendance is compulsory in both Internal & External Theory Examinations.**

**FY Bachelor of Arts Evaluation pattern and Question paper pattern for Semester End Practical Examination of Major Course**

| Internal Continuous Assessment: 40% (20 Marks) | Semester End Examination: 60% (30 Marks) | Duration for End semester examination |
|---|---|---|
| Viva/ assignment/ objective question test /Small experiments (15 Marks), Overall performance (5 Marks) = 20 Marks | As per paper pattern | 1 hr |

**FY Bachelor of Arts Evaluation pattern and Question paper pattern for Semester End Practical Examination of Vocational Skill Courses and Skill Enhancement Courses**

| Internal Continuous Assessment: 40% (20 Marks) | Semester End Examination: 60% (30 Marks) | Duration for End semester examination |
|---|---|---|
| Viva/ assignment/ objective question test /Small experiments (15 Marks), Overall performance (5 Marks) = 20 Marks | As per paper pattern | 1 hr |

**Signatures of Team Members**

| SR.No. | Name | Signature |
|---|---|---|
| 1. | Asst.Prof. Rajaram V Thorbole | |
| 2. | Asst. Prof. Vimukti S. Jadhav | |
| 3. | Asst.Prof. Srushti Mane | |
| 4. | Dr. Sandeep Bhele | |
| 5. | Dr. Anand Katikar | |
| 6. | Dr. Sheetal S.Gorde/Patil | |
| 7. | Mr. Vivek Gadre | |
| 8. | Ms. Rekha Kamale/ Lokhande | |

**Letter Grades and Grade Points:**

| **Semester GPA/ Programme CGPA Semester/ Programme** | **% of Marks** | **Alpha-Sign/ Letter Grade Result** | **Grading Point** |
|---|---|---|---|
| 9.00 - 10.00 | 90.0 – 100 | O (Outstanding) | 10 |
| 8.00 - < 9.00 | 80.0 - < 90.0 | A+ (Excellent) | 9 |
| 7.00 - < 8.00 | 70.0 - < 80.0 | A (Very Good) | 8 |
| 6.00 - < 7.00 | 60.0 - < 70.0 | B+ (Good) | 7 |
| 5.50 - < 6.00 | 55.0 - < 60.0 | B (Above Average) | 6 |
| 5.00 - < 5.50 | 50.0 - < 55.0 | C (Average) | 5 |
| 4.00 - < 5.00 | 40.0 - < 50.0 | P (Pass) | 4 |
| Below 4.00 | Below 40.0 | F (Fail) | 0 |
| Ab (Absent) | - | Ab (Absent) | 0 |

**Justification for Bachelors in Bachelor of Arts**

| | | |
|---|---|---|
| 1. | Necessity for starting the course: | व्यावसायिक कौशल्ये: मुद्रितशोधन, सूत्रसंचालन आणि अनुवाद यांसारखी कौशल्ये विकसित करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.<br><br>प्रभावी संवाद: मराठी भाषेचा प्रशासकीय, व्यावसायिक आणि सामाजिक स्तरावर शुद्ध व प्रभावी वापर करण्यास सक्षम करणे.<br><br>साहित्यिक जाणीव: मराठी साहित्यातील विविध प्रवाह आणि लोकसाहित्याचा परिचय करून देऊन विद्यार्थ्यांची अभिरुची समृद्ध करणे.<br><br>तंत्रज्ञान आणि मराठी: डिजिटल माध्यमांमध्ये (Social Media, Unicode) मराठीचा वापर वाढवणे आणि त्यातील तांत्रिक ज्ञान देणे.<br><br>भाषिक वारसा: जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन करून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे. |
| 2. | Whether the UGC has recommended the course: | **Yes** |
| 3. | Whether all the courses have commenced from the academic year 2023-24. | The course has already commenced in the university and in the academic year 2023-24 it is restructured under NEP 2020 |
| 4. | The courses started by the University are self-financed, whether adequate number of | This course is aided / self-financed based on the sanction given by University of Mumbai to affiliated colleges time to time. |

| | | |
|---|---|---|
| | eligible permanent faculties are available?: | |
| 5. | To give details regarding the duration of the Course and is it possible to compress the course?: | The duration of the program is three years (6 semesters). It is not possible to compress the course. |
| 6. | The intake capacity of each course and no. of admissions given in the current academic year: | 120 per division |
| 7. | Opportunities of Employability / Employment available after undertaking these courses: | माध्यम व मनोरंजन: वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स आणि रेडिओमध्ये बातमीदार, संपादक, निवेदक (Anchoring) व पटकथा लेखक म्हणून संधी.<br><br>प्रकाशन व्यवसाय: पुस्तक प्रकाशनामध्ये व्यावसायिक 'मुद्रितशोधक' (Proofreader) आणि तांत्रिक संपादक म्हणून काम.<br><br>अनुवाद सेवा: सरकारी व खाजगी क्षेत्रांत, तसेच जाहिरात आणि आयटी कंपन्यांमध्ये 'मराठी अनुवादक' (Translator) म्हणून मागणी.<br><br>प्रशासकीय सेवा: स्पर्धा परीक्षांद्वारे (MPSC/UPSC) सरकारी कार्यालयांत अधिकारी किंवा 'भाषा सल्लागार' म्हणून नियुक्ती.<br><br>शिक्षण व संशोधन: शाळा, महाविद्यालयांत अध्यापन आणि विविध संशोधन प्रकल्पांत सहभाग.<br><br>डिजिटल मार्केटिंग: सोशल मीडिया, ब्लॉगिंग आणि कंटेंट रायटिंग (Content Writing) क्षेत्रात मराठी लेखकांसाठी मोठ्या संधी. |